

कवी चारुदत्त

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

सरोवर

(काव्य संग्रह)

चारुदत्त

सरोवर(काव्यसंग्रह)

कवी : **चारुदत्त**

पत्ता : मंगेश वि. चौधरी,६९/बी/८, गिरीराज नागरी निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, नानिप संकुल -२, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, गोरेगांव पूर्व,
मुंबई – ४०००६५.
फोन : ७५८८७२७५२२(वॉट्स अप क्रमांक).
ईमेल: mangeshchoudary22@gmail.com
ब्लॉग आयडी : welcomezindagimarathi.blogspot.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २४ जुलै २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. /- फक्त (पुस्तक पानांच्या दुप्पट)
(% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क-

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

मंगेश वि. चौधरी

*शिक्षण – बी. ए. मुंबई विद्यापीठ.

*सेवा/व्यवसाय - सेवानिवृत.

*छंद म्हणून पूर्वीपासून विविध विषयावर वाचन, लेखन केले आहे व करीत आहे. भटकंती, गिर्यारोहण, चित्रपट पाहणे याचीही आवड असून त्यावर लिहिणे होते.

*वर्तमानपत्रे, मासिके, दिवाळी अंक, यांमधून वेळोवेळी लेख प्रसिद्ध झाले आहेत. मुंबई आकाशवाणी केंद्रावर दोन वेळा लेखांचे वाचन प्रसारित झाले आहे.

*सामाजिक कार्याची आवड असून काही समाजसेवी संस्थांसमवेत कार्यरत आहे.

*'यस, लाईफ इज ब्युटीफूल बट,.....' ई मराठी पुस्तक(२०२२) आणि 'हे जीवन सुंदर आहे....'(२०२४) हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

*दरमहा मराठी ब्लॉग लेखन २०१८ पासून करीत आहे. यामध्ये अवतीभवतीचे सगळे विषय असतात.

*ब्लॉग टायटल – Yes, Life is beautiful, but.....

|| अर्पण पत्रिका ||

मला वाचनाची गोडी त्यांनी लावली,

मग मी लिहिता झालो,

त्या माझ्या स्वर्गस्थ आई-बाबांना

हा काव्यसंग्रह सस्नेह अर्पण.....

🍀 सरोवरा काठी..... 🍀

सस्नेह नमस्कार,

वास्तविक काव्य लिहिणे हा माझा प्रांत नाही. ललित लेखन व ब्लॉग लिहिणे हा साहित्य प्रकार मला जवळचा वाटतो. कमीत कमी शब्दांत मोठा आशय व्यक्त करणारे काव्य लेखन हे ललित लेखनापेक्षा अवघड असते. पण मी प्रयत्न केला आहे. त्यातून हे छोटे सरोवर निर्माण झालेय.

यात प्रेम नाही, निसर्ग नाही, कुणाचा गौरवही नाही, तर अस्वस्थ आणि तिरके भाष्य काव्यबद्द केले आहे. मन अस्वस्थ असताना या सरोवरात एकेक थेंब जन्माला आलाय. यातील 'अवताल' अंतर्मनातील खदखद, तर 'भवताल' जनमनातील अस्वस्थता प्रकट करते.

ई साहित्य प्रतिष्ठानने माझे मराठी निवडक ब्लॉग लेखन असलेले "यस, लाईफ इज ब्युटीफूल, बट....." ई बुक २०२२ साली प्रकाशित केले होते. त्यानंतर "हे जीवन सुंदर आहे...." हे पुस्तक सकाळ प्रकाशन द्वारे २०२४ मध्ये प्रकाशित झाले.

ही तिसरी साहित्यकृती ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने आणि संपादकीय परिवाराच्या सक्रिय सहकार्यामुळे प्रकाशित होत आहे, याचा मनःपूर्वक आनंद आहे.

हे सरोवर चविष्ट आहे की बेचव, हे त्यातील थेंब चाखून तुम्हीच सांगू शकाल. या विषयी निःसंकोचपणे कळवा. पुढच्या वेळी नव्या ईर्षेने सरोवर निर्माण करेन.

इति.

आपला,

चारुदत्त.

🌹 🌹 अवताल 🌹 🌹

१--मठी 🌹 ----------

२--देवघर 🌹 ----------

३--मरण घाव 🌹 ----------

४--म्हणून तर मी जगतो आहे.... 🌹 ----------

५--मी भाग्यवंत ते करंटे ..... 🌹 ----------

🌷 मठी 🌷

‘हा’ पूजा करतो,
‘तो’ केर काढतो.
याला देवपूजेचा मान,
तो गुरव काम करतो.
हात जोडताना याला तो लागतो,
एरव्ही मात्र तो डावा.
मुजऱ्याचा मान याचा,
तो फक्त जोहार करणार.
याला सर्वत्र संरक्षण मिळते,
त्याला ते स्वतः करावे लागते.
याला शेंडी आहे,
पण गाठ मारायला तो लागतो.
गरजेपोटी दोघे
एकमेकांचे सोबती झालेत.
म्हणून दोघांची
मठी एकच आहे.

🌷 देवघर 🌷

दिव्याची बायको पणतीला म्हणते,
नुसतीच जळतेस देवापुढे,
बघ जरा माझा दिवा
कसा पाझळतोय.
फक्त देवालाच नव्हे,
सगळ्यांना प्रकाश देतोय !

पणती बिचारी सावरून म्हणते,
उगीच टेंबा मिरवू नकोस
घासलेटच्या दिव्याचा.
देवाला पणतीच लागते पूजेला
दिव्याची नुसतीच
भगभग अन् धूर !

दिव्याची बायको फणकारत म्हणते,
अगं देव देव काय करतेस
माझा दिवा बघ.

देव बघत नाही,
की दानव बघत नाही
अंधारात सगळ्यांना वाट दाखवतो !

पणती उत्तरते,
मान्य आहे गं मला,
पण रोज यावच लागतं ना
प्रत्येक भक्ताला देवळात !

हसून दिव्याची बायको बोलते,
अगं बाई, यावं नाही,
जावं लागत शेवटी प्रत्येकाला,
देवळात नव्हे, देवाघरी.
तेव्हा पण घासलेट लागते
माझ्या दिव्याचे !

पणती बिचारी निशब्द होते,
अन् विझून जाते.....

.....

🌹 मरण घाव 🌹

आकाशातील शापित तारे
छिन्नी हातोड्याचा घाव
माझ्यावर घालत आहेत.

तरी माझ्यातील दगडाची
शिल्पाकृती तयार होत नाही.

देवाने हीच शिक्षा त्यांना दिलीय.
जोपर्यंत शिल्पाकृती तयार होत नाही
तोपर्यंत बिचारे तारे
शापमुक्त होणार नाहीत
पुन्हा गंधर्व होण्यासाठी.

देव आणि ताऱ्यांमध्ये
मरण घाव मी सोसत आहे.....

🌷 म्हणून तर मी जगतो आहे.... 🌷

ताण घेतले कधी ओढवून,
कधी नशिबाने ताणले.
ताण तणावात या बुडू लागलो,
परी छंदांनी मज जगविले.

म्हणती सदैव स्वकीय,
कर्तव्याला विसरून हा नेहेमी
स्वतः पुरते बघत असतो.
आपल्याच नादात असतो !
स्वार्थी कुठला !
व्यवहाराचेही साधे ज्ञान
याला नाही.
सगळेच याला फसवतात.

हे ऐकून मनी दुःख नाही, खंत नाही,
फक्त यांची कीव येतेय.

अरे, आपण अनुभवले तेवढे यांनी अनुभवलेय ?
आपण झेलले तेवढे यांनी झेललेय ?
आपण सोसले तेवढे यांनी सोसलेय ?
मठ्ठ, सुस्त आणि मेंढरागत जगणारी ही माणसं.
यांच्या जाणिवेतच अवघी उणीव आहे.

मात्र जमाना यांचा आहे.
अशी लाखो, करोडो आणि अब्जावधी मेंढरं
जगत आहेत.....
अन् त्यांच्या कळपात मीही जगतो आहे.

माझे छंद माझे प्राण आहेत,
म्हणून तर मी जगतो आहे.....

::::::::::::::::::::::

🌷 भाग्यवंत मी, ते करंटे 🌷

भवती शत्रू असूनही, .
निर्धोक मी चाललो.
कधी पडलो इथे तिथे,
वाटा होत्या परी सोबतीला
मैत्र अन् सहचरांच्या.
भाग्यवंत मी,
ते करंटे.

त्यांचे रक्तनाते नव्हे
अव्यक्त प्रेम होते उशाशी.
शांत निद्रा लाभली मज,
मग दिन किरणांसवे
उत्साही दौडलो.
भाग्यवंत मी,
ते करंटे.

भरारी मारता मारता
आभाळ कवेत आले.
विसावलो, निवांत झालो.
फक्त डोळे दोन पहात होते
अथांग, उत्तुंग,
आणि निरामय भवताल.
भाग्यवंत मी.
ते करंटे.

न्याहाळले निसर्गा,
अन् भवभूतांना
झाले तेही आता
माझे सहचर.
सांगा ? या परी असे
संतोष आगळा ?
भाग्यवंत मी,
ते करंटे.

आता त्यांची टीका,
त्यांची टिप्पणी
लखलाभो त्यांना.
खूप आलो मी दूर
ते तैसेच राहिले
टीका करीत,
टिप्पणी करीत.

बैसो तैसेच कंठत.
भाग्यवंत मी,
ते करंटे.....

:::::::::::::::

🍀 🍀 भवताल 🍀 🍀

१--सेवेकरी 🍀 ----------

२—मेरा गाव मेरा देश ! 🍀 ----------

३--मी निर्लज्ज आहे, निर्बुद्ध नाही 🍀 ----------

४—त्यांना न मानणारेही आहेत, पण... 🍀 ----------

५—मनोमिलन 🍀 ----------

🍀 सेवेकरी 🍀

कसली नीती, कसली भीती ?
खरी आपली रक्तनाती.
आधी पूर्वज,
मग मी, नंतर सौ.,
सुपुत्र, सुनबाई,.....
त्यानंतर कोणीही चालेल,
पण आपल्याच
रक्त नात्यातले हवे.

सेवेकरी ? ते तर हवेच हवे.
त्यांच्या शिवाय आम्ही होऊ भणंग.

पण त्यांना 'पेट्या' झेपतील काय ?,
आणि त्यांना आहे ?
गेंड्याची निबर कातडी ?

ते आमचे सेवेकरीच राहू द्या.
ते उपाशी थोडेच राहणार ?
आम्ही खाऊ, त्यांनाही खिलवू

म्हणा जिंदाबाद, जिंदाबाद,
घराणेशाही जिंदाबाद.....
घराणेशाही जिंदाबाद.....

::::::::::::::::

🍀 मेरा गाव मेरा देश ! 🍀

आज ते सत्तेवर आहेत,
काल आम्ही होतो.
आज सभात्याग करणे आमच्या हातात आहे,
काल ते त्यांच्या हाती होते.
तेव्हा बेड्या होत्या त्यांच्या हातात,
आज ते आम्हाला बेड्या ठोकायला निघालेत.
आज त्यांना भक्कम आधार आहे चार
खांबांचा,
तेव्हा तो आम्हालाही होता.
काल ते घराणेशाहीवर गरळ ओकायचे,
आज सगळी घराणी त्यांनी आत घेतलीत.

बाकी त्यांचं आमचं एक सेम आहे,
सत्तेवर अतीव प्रेम आहे.

एरव्ही मरु देत ती जनता,

मरू देत ते मतदार,
मरू दे ते गाव
मरू दे तो देश.
फक्त घोषणा देऊ,
मेरा गाव मेरा देश !
मेरा गाव मेरा देश !

:::::::::::::::

🍀 मी निर्लज्ज आहे, निर्बुद्ध नाही 🍀

मी निर्लज्ज आहे
पण निर्बुद्ध नाही.
केवढा मोठा पल्ला गाठलाय,
इकडून पार तिकडे गेलोय मी !

आता माझी ऐट, पत प्रतिष्ठा
खूप वाढलीय !

अरे, गेले उडत !
मला घडवणारे आणि डूबवणारे.

मीच मला मोठं केलंय.
त्यांनी जमवली पुंजी,
पण मिळवून देणारा
मीच होतो ना !

मान्य आहे,
त्यांचे तुकडे खात होतो,

त्यांची थुंकीही झेलत होतो.

त्यातलंच थोडं चाखलंय,
थोडं ढापलंय !
माझं त्यात काय चुकलंय ?

आता माझे दिवस आलेत,
मी आता तुकडे फेकणार
ते झेलणारे खूप मिळतील.
खाणारेही खूप मिळतील.

ते जर राजकारणी आहेत,
मी आहे सवाई राजकारणी !
ते तरबेज आहेत,
मी धूर्त आहे.

राजकारण त्यांनाच जमतं ?
त्यातलं थोडं मलाही भावतं.

::::::::::::::::::::::::::::

🍀 त्यांना न मानणारेही आहेत, पण.... 🍀

राजकारणाचा चिखल करणारे,
खरं बोलणारांना देशद्रोही ठरवणारे,
घोटाळे केले तरी सत्ता न सोडणारे,
पक्षांतर करूनही उच्चतम पुरस्कार मिळविणारे,
हवा तेवढा राडा करून कॅबिनेट मिळविणारे,
हत्त्या घडवून, हाती बेड्या पडूनही मंत्री होणारे,
पणजोबापासुन पणतूपर्यंत सत्तापद धरून ठेवणारे,
शिक्षणाच्या गंगोत्रीची गटारगंगा करूनही
स्वतःला सम्राट म्हणुन मिरवणारे,

या सर्वांना न मानणारेही आहेत
पण ते आहेत 'किस झाड की पत्ती' !

::::::::::::::::::::

☘ मनोमिलन ☘

तसे आम्ही एक आहोत,
अधिवेशनात तेवढे भांडतो.

सभागृह त्याग
आमचा जन्मसिद्ध हक्क आहे.
आम्ही तो मिळवणारच.

हजेरी लागतेच आहे.
अन् पेन्शन कुठे जाणार आहे ?
कोणी कोणाची खिल्ली उडविली ?,
कोणी कोणाला कसे सावरले ?

यावर संध्याकाळी
रंगीत संगीत चांगभलं होईल,

आणि,.....अखेर आमचे
मनोमिलन होईल.

::::::::::::

🌿 कवितांचे गर्भितार्थ 🌿

अवताल :--

*असमान वातावरणात एकमेकांना धरून एकत्र रहावे लागते, गरज म्हणून !

*आपल्याला प्रकाशाची वाट मिळाली, तरी आपली शेवटची वाट तीच असते.

*आपण सतत टीकेचे घाव सोसत असतो, हे घाव मरणयातना देणारे असतात. परंतु त्यातही एक सुख असते !

*माणूस मनस्वी छंदिष्ठ असला तर प्रतिकूल परिस्थितीतही जगू शकतो,

*प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात टीकाकार असतो. त्याला डावलून पुढे जाता येत नाही. परंतु प्रत्येकाला पुढे तर जायचे असते !

भवताल :--

दिवसेंदिवस राजकारणी खालची पातळी गाठत आहेत. लाजेलाही लाज वाटेल इतके धक्के दळभद्री राजकारणी दररोज देत आहेत. सजग आणि संवेदनशील मन त्यामुळे अस्वस्थ होते आहे. त्यावर चिड व्यक्त करणाऱ्या कविता उस्फूर्तपणे लिहिल्या आहेत. अशा प्रसंगानुरूप कविता अजून लिहिता येतील.

दुर्दैव हे आहे, की निबर कातडीच्या राजकारण्यांना या कवितांमुळे कोणताच फरक पडत नाही, उलट, ते अशा कवितांची अधिक वाहवा करतील ! वरताण म्हणजे, असे साहित्य प्रकाशित करण्यासाठी हेच लोक पुढाकार घेऊन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितही राहतील !

प्रामाणिक जनसेवक आणि निस्वार्थी, सेवाभावी राजकारणी यांना मात्र यातली टीका लागू नाही. त्यांच्या सत्कार्याला माझे सदैव वंदन आहे.

::::::::::::::::::::::::::::::

हे पुस्तक वाचण्यासाठी इथे क्लिक करा